# व्हायरल आजोबा!

दोन अंकी नाटक


## ले. प्रल्हाद जाधव


**पात्रे:**

१. वसंत (२५)
२. चैत्राली (२५)
३. माधव (४५)
४. वसुधा (४५)
५. अण्णा (७०)

अंक पहिला / प्रवेश पहिला

(पडदा उघडतो. दूरवर ढगांचा गडगडाट ऐकू येत आहे. प्रकाश. डोंगर उतारावरील कौलारू घर दिसते. अंगण. अंगणाला लागून पडवी. अंगणात जुन्या पद्धतीची पलंगवजा खाट. एखादे बाकडे. छोटे स्टूल. एकीकडे तुळशीवृंदावन. दुसरीकडे हातपाय धुण्यासाठी मोरीसारखी जागा. बादली, तांब्या. तेथे हात-पाय-तोंड धुता येते, गाई-गुरांसाठी मागील गोठ्यात पाणी नेता येते. बाजूच्या दोरीवर पंचा, एक-दोन कपडे.

पडवीतून एक पायरी चढले की घराचा मुख्य दरवाजा.  दाराच्या बाजूला खिडकी. सारवलेल्या भिंती. त्यावर पशुपक्ष्यांची, पानाफुलांची चित्रे. खिडकीच्या चौकटीला नक्षी. दरवाजाला तोरण. वर लाईटचा बल्ब. खिडकीच्या बाजूला लाईटचा एक बोर्ड. बटणे, प्लग-पिन. पडवीतील एका खांबाच्या तळाशी कुंडी. त्यात मोगऱ्याची वेल ती खांबावर चढलेली आहे. फुले आलेली आहेत.

अंगणाच्या पुढच्या बाजूला दोन डेलक्यांवर आडवा वासा टाकून केलेले छोटे कंपाउंड. त्या पुढे प्रेक्षकांच्या दिशेने दीड दोन फूट रुंदीची मोकळी जागा. तेथून खाली डोंगराचा उतार. तेथे उभे राहिले की आजूबाजूची झाडे, आकाश, समोरची दरी दिसते अशी कल्पना.

घराच्या डाव्या भिंतीकडून म्हणजे प्रेक्षकांच्या उजव्या बाजूने मागे जाण्यासाठी भिंतीला लागून एक बोळ. तो अर्थात् दिसत नाही. मागे गोठा, परसबाग, गावातील इतर घरे, शाळा, पटांगण, मंदिर आणि तेथून वर दुसऱ्या वाडीकडे जाण्याचा रस्ता. त्या वाडीच्या बाजूने गायत्री नदीचा उगम होतो अशी कल्पना. प्रेक्षकांच्या डाव्या बाजूकडील वाटेने घरात येता येते तर उजव्या बाजूच्या वाटेने गावात आणि मग पुढे वरच्या वाडीकडे जाता येते.

पक्षांची किलबिल सुरू आहे. एकीकडून वसंत येतो. वय पंचवीस. केसांची पोनी. वाढलेली दाढी. डोक्यावर पी-कॅप. पाठीला सॅक. आत लॅपटॉप,चार्जर, एखादे पुस्तक, काही कागदपत्रे. हातात फोन. सॅकमधून पाण्याची बाटली बाहेर डोकावते आहे. वसंत घराचा परिसर, घर न्याहाळतो. दाराला बाहेरून कडी लावलेली आहे. तो बॅग काढून ठेवतो. स्वतःशी, हळूहळू प्रेक्षकांशी बोलू लागतो.

वसंत : कोणाचे घर आहे कोणास ठाऊक! बाहेरून कडी लावलेली आहे म्हणजे आजूबाजूलाच असणार कोणीतरी. जाऊ द्या. बसावं थोडा वेळ, आराम करावा आणि मग निघावं पुढं.

(सॅकमधून बाटली काढतो. पाणी पित इकडे तिकडे पाहू लागतो. पक्ष्यांची किलबिल.) कित्येक दिवसात अशी शांतता, पक्ष्यांची अशी किलबिल ऐकली नव्हती. हे सुख शहरात नाही!

(पुढे येऊन खाली पहात) वाटलं नव्हतं इतक्या उंचावर गाव असेल म्हणून! (डावी- उजवीकडे पहात) झाडं किती मस्त वाढलीत. आंबा जांभूळ, काजू,फणस... व्वा! इतकं वर चढून आलो पण दमल्यासारखं वाटलं नाही. खरंच निसर्गाच्या सानिध्यात आलं की उत्साही वाटतं. प्रसन्न वाटतं. कोणीतरी आतून ताकद देतंय असं वाटतं.

(प्रेक्षकांना) वर आलं की खालचं जग किती लहान वाटू लागतं ना! अधून-मधून असं घराबाहेर पडून फिरलं पाहिजे! चौकटीतून बाहेर पडलं पाहिजे. पण जगणं असं बांधून टाकतं की ते शक्यच होत नाही. आमच्या त्या अतीशहाण्या बॉसशी भांडण झालं म्हणून मुंबईतील नोकरी सोडून पुण्याला आलो. बायको पुण्यात आधीच नोकरीला होती. तिनं स्वतःच्या हिंमतीवर घेतलेलं घर होतं. पण तिच्याशीसुद्धा भांडणं व्हायला लागली. घर सोडण्याचे विचार मनात येऊ लागले. इतका की वैतागलो तेही सोडलं. दिसेल ती वाट पकडून इथं आलो.

पुढं काय वाढून ठेवलंय ते माहीत नाही. माहीत नसलेलंच बरं. कारण सगळ्या गोष्टी आपल्या मनाप्रमाणे होतील असं नाही. बऱ्याचदा आपण ठरवतो एक आणि घडतं भलतंच काहीतरी. जॉन लेनन यांनी म्हटलंय ना; 'लाइफ इज व्हाट हॅपन्स टू यु व्हेन यू आर बिझी मेकिंग अदर प्लॅन्स...” आपण जेव्हा आपल्या जगण्याची एक गोष्ट लिहीत असतो तेव्हा जीवनही आपल्यासाठी एक वेगळी गोष्ट लिहून ठेवत असतं आणि बऱ्याचदा तीच गोष्ट खरी ठरते.

(गाईच्या हंबरण्याचा आवाज. बोळाच्या बाजूने वसुधा येते. वय-४५. छान सुती साडी, मॅचिंग ब्लाउज. मानेवर रुळणारा सैल अंबाडा. देखणं हसतमुख व्यक्तीमत्व. हातात टोपली. तित मुळा, माठ, शेवग्याच्या शेंगा डोकावत आहेत. वसंतला पाहून 'हा कोण येथे!' अशा गोंधळात.)
वसंत : नमस्कार!
वसुधा : नमस्कार! कोण आपण? कोण पाहिजे?
वसंत : मी– मला... आय मीन–
वसुधा : बोला की! कुठं जायचं आहे? कोण पाहिजे?
वसंत : मी- मला...
वसुधा : असं काय करताय हरवल्यागत?
वसंत : बरोबर ओळखलंत तुम्ही, हरवलोय मी! (संगीत)
वसुधा : म्हणजे? नेमकं काय समजायचं मी?
वसंत : ते मलाही नाही सांगता येत.
वसुधा : कमाल आहे, काय नाव तुमचं?
वसंत : अरे तुरे केलं तरी चालेल–
वसुधा : पण तू कोण हे तर सांग आधी,कोण पाहिजे तुला?
वसंत : घाबरू नका, मी काही कोणी चोर-लफंगा नाही. तुम्हाला काहीही त्रास होणार नाही माझ्याकडून.
वसुधा : अरे पण काहीतरी नाव-गाव असेल ना तुझं?
वसंत : वसंत.
वसुधा : बस एवढंच?
वसंत : वसंत काटदरे.
वसुधा : गाव?
वसंत : तळेगाव दाभाडे... पुणेच समजा!
वसुधा : मग इकडं कशाला आलायस?
वसंत : असाच आलो, फिरत फिरत!
वसुधा : फिरत फिरत?
वसंत : कसं सांगू आता तुम्हाला!

वसुधा : मुंबई-पुण्याचे लोक मौजमजा करायला थंड हवेच्या ठिकाणी नाहीतर खाण्यापिण्याची चंगळ असणाऱ्या ठिकाणी जातात; तू या आडगावात कसा आलास?
वसंत : गाव खूप आवडतं मला.
वसुधा : ते का?
वसंत : गावचं हवापाणी चांगलं असतं, माणसं साधीभोळी असतात.
वसुधा : असं काही नाही, माणसं सगळीकडे सारखीच. आणि हवा पाण्याचं म्हणशील तर तेही बिघडत चाललंय हल्ली.
वसंत : खरं आहे तुमचं एका अर्थी.
वसुधा : मग का आलाहेस इथं ते सांगशील आता?
वसंत : मनात आलं– झालं!
वसुधा : मनात आलं? डोकंबिकं फिरलंय का काय तुझं?
वसंत : (हसत) तसं म्हणा हवं तर!
वसुधा : नोकरी धंदा काही करतोस की नाही?
वसंत : नोकरी होती.
वसुधा : मग?
वसंत : गेली ती.
वसुधा : का?
वसंत : आपलं स्वातंत्र्य गहाण टाकणं नको वाटलं मला.
वसुधा : शिकलेला दिसतोयस चांगला.
वसंत : (गप्प)
वसुधा : घरी कोणी नाही का? बायको-पोरं, आई-वडील?
वसंत : बायको होती.
वसुधा : होती म्हणजे?
वसंत : तिच्यामुळेच घर सोडलं.
वसुधा : अरे काय बोलतोस!
वसंत : रोज सकाळी उठलं की भांडणं सुरू!
वसुधा : सगळीकडे तेच असतं, घरोघरी मातीच्या चुली!
वसंत : म्हणजे तुमच्या घरी असंच चालतं?
वसुधा : अगदी सगळ्यांच्याच घरी!
वसंत : जीव गुदमरायला लागला माझा. आत- बाहेर थोडीही शांतता नाही, मग काय करू?
वसुधा : अरे पण त्यासाठी घर सोडायचं? आणि आपण जीवनाकडे पाठ फिरवली म्हणून ते काही आपल्याकडं पाठ फिरवत नाही हे लक्षात कोण घेणार?
वसंत : शिक्षिका चांगली झाला असता तुम्ही.
वसुधा : शिक्षिकाच आहे मी. आधी पुण्यात होते. काही कारणाने ती नोकरी सोडली आणि इथं येऊन राहायचा निर्णय घेतला. इथंही शिकवण्याचंच काम आहे. पण ते नोकरी म्हणून नाही तर सेवा म्हणून!
वसंत : (हात जोडत) ग्रेट आहात तुम्ही!
वसुधा : ग्रेट वगैरे काही नाही. प्रत्येकाचं काहीतरी वैशिष्ट्य असतंच. तुझासुद्धा अपवाद नाही त्याला.
वसंत : गोंधळून गेलोय मी. काय करतोय ते माझं मलाच कळत नाही.

वसुधा : अरे पण तू नेमका इथेच आलास ते सांग की!
वसंत : मी आलो म्हणण्यापेक्षा माझ्या पायानी मला आणलं इकड. त्यांना विचारा हवं तर!
वसुधा : पायांना कसं काय विचारू? कविता वगैरे करतोस की काय?
वसंत : मनात कायम अस्वस्थता असते. काहीतरी हरवलंय असं सतत वाटत असतं; नक्की काय ते सांगता येत नाही.
वसुधा : भूक लागलेय का तुला?
वसंत : (पाहत आहे)
वसुधा : थांब आणते काहीतरी.
वसंत : नको तुम्हाला उगाच कशाला त्रास?
वसुधा : त्यात कसला आलाय त्रास? साबुदाण्याची खिचडी केलीय आत्ताच, आणते थोडी! (आत जायला निघते)
वसंत : आंबेवाडी हीच ना?
वसुधा : म्हणजे आंबेवाडीला यायचं होतं तुला हे तरी नक्की झालं.
वसंत : ‘नवचेतना विद्या मंदिर’ इथेच आहे ना?
वसुधा : बरोबर.
वसंत : त्यांची जाहिरात आलीय ‘सकाळ’मध्ये.
वसुधा : (उमजून) हूं, योग्य ठिकाणी आलायस तू.
वसंत : थँक गॉड!
वसुधा : बायकोशी कशामुळे भांडलास?
वसंत : मी नाही भांडलो नोकरीसाठी रोज कट करायची.
वसुधा : घरी बसून रोज फुकट खायला कोण घालील?
वसंत : अगदी हेच म्हणायचं ती पण एवढा रिकामटेकडा नाही मी. लेखन हा छंद आहे माझा. लेख कथा कविता लिहितो. अधून मधून– छापून येतं ते. मानधन मिळतं. शिवाय आधीची बचत आहे.
वसुधा : तरीही काही कामधंदा तरी हवा की माणसाला! पर्सनॅलिटी चांगली आहे तुझी, नाटक-सिनेमाच्या क्षेत्रात गेला असतास तर हिरो झाला असतास.
वसंत : तुम्हाला माहिती आहे का काही त्यातली?
वसुधा : माझे मिस्टर शाळेत मुलांची नाटकं बसवतात. त्यांच्यासोबत राहून कळायला लागलंय थोडं थोडं...
वसंत : पण अभिनय करत बसण्यापेक्षा गोष्टी लिहायला त्या सांगायला आवडतं मला.
वसुधा : गोष्टी सांगायला आवडतं? (संगीत.)
वसंत : ( नकळत गोष्ट सांगणं सुरु करतो. त्याच्यावर प्रकाश. हलकं संगीत.) फ्रान्झ काफ्का नावाचा एक मोठा लेखक होऊन गेला. एका बागेत नेहमी फिरायला जात असे तो. एकदा तिथे त्याला एक लहान मुलगी रडताना दिसली. तिची बाहुली हरवली म्हणून ती रडत होती. बाहुली शोधायला त्यानं तिला मदत केली पण ती काही सापडली नाही. मग दुसऱ्या दिवशी पुन्हा दोघांनी मिळून प्रयत्न करायचं ठरलं. पण दुसऱ्या दिवशीही बाहुली काही सापडली नाही. मुलीचं रडणं थांबेना. मग त्यानं एक आयडिया केली. पुढच्या दिवशी तो पुन्हा तिला बागेत भेटला आणि बाहुलीच्या वतीनं त्यानं तिला एक पत्र दिलं. बाहुलीनं त्यात लिहिलं होतं, “मी हरवलेली नाही तर जग पाहण्यासाठी बाहेर निघाले आहे. मी जिथे जिथे जाईन तेथून तुला पत्र लिहून तिकडे काय काय पाहिले हे कळवणार आहे.” ते पत्र वाचून मुलगी शांत झाली. पुढे जेव्हा जेव्हा त्या मुलीची आणि काफ्काची भेट व्हायची तेव्हा तेव्हा तो तिला बाहुलीचं एकेक नवीन पत्र वाचून दाखवायचा. बाहुलीच्या प्रवासाची ती थरारक आणि कल्पनारम्य पत्रं ऐकताना मुलीला आनंद व्हायचा आणि ती आपलं दुःख विसरून जायची. हळूहळू त्यांच्या भेटी संपत आल्या. शेवटच्या भेटीत काफ्कानं तिला एक बाहुली आणून दिली. पण ती पाहून मुलगी म्हणाली ही माझी बाहुली नाही. तेव्हा

काफ्काने तिला त्या बाहुलीचं आणखी एक पत्रं दाखवलं. त्यात लिहिलं होतं,  “प्रवासामुळे माझ्यात खूप बदल झाला आहे. मी एकदम वेगळीच दिसायला लागली आहे.” हे मुलीला  पटलं. तिनं ती बाहुली घेतली आणि घरी जाऊन आपल्या कपाटात ठेवून दिली. त्यानंतर खूप वर्षे गेली. मुलगी मोठी झाली. एक दिवस तिला कपाटात ठेवलेली ती बाहुली दिसली. ती काढून तिनं नीट पाहिलं तर तिच्या त्या छोट्याशा फ्रॉकमध्ये एक चिठ्ठी खूपसून ठेवलेली तिला दिसली. तिने ती उघडून वाचली तर त्या चिठ्ठीत लिहिलं होतं–

वसुधा : (स्वतःहून उत्स्फूर्तपणे पुढील भाग सांगते-) “जीवन तुमची आवडती गोष्ट तुमच्याकडून हिरावून घेतं हे खरं आहे पण कोणत्या ना कोणत्या रूपानं ती तुम्हाला परतही करत असतं. आपण ते नीट समजून घेतलं पाहिजे इतकंच”

वसंत : व्वा! तुम्हाला माहीत होती ही गोष्ट?

वसुधा : कधीतरी कानावरून गेली होती. आवडली म्हणून लक्षात राहिली.

वसंत : पण एक लक्षात येत नाही–

वसुधा : काय?

वसंत : जीवनाला जर आपल्याला काही बक्षीस द्यायचंच असेल तर मग ते आपली परीक्षा तरी का घेतं?

वसुधा : स्वतः अनुभवल्याशिवाय कळत नाही ते. आणि सगळ्याच गोष्टी एकदम लक्षात आल्या तर जगण्यात गंमत काय राहिली!

वसंत : शोभता तुम्ही शिक्षिका!

वसुधा : चला निघायला हवं. अण्णांना खिचडी नेऊन द्यायची आहे; वाट बघत असतील ते. आज महादू आला नाही आमचा.

वसंत : (ओशाळून) सॉरी मी वेळ घेतला तुमचा.

वसुधा : काही हरकत नाही. डबा तयारच आहे तू ही चल बरोबर. नाहीतरी अण्णांना भेटायचं आहे तुला.

वसंत : अण्णा?

वसुधा : नवचेतना विद्या मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष! इंटर्व्यूसाठी आला आहेस ना तू?

वसंत : ओ माय गॉड!

वसुधा : काय झालं?

वसंत : म्हणजे त्यांच्याच घरी आलोय का मी?

वसुधा : हेही स्पष्ट करून सांगायला पाहिजे का आता?

वसंत : कमाल आहे या योगायोगाची!

वसुधा : होतं असं कधी कधी.

वसंत : कसे आहेत तुमचे हे अण्णा?

वसुधा : कसे म्हणजे?

वसंत : स्वभावाला–

वसुधा : आता बघशील तू.

‘मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास, कठीण वज्रास भेदू ऐसे’

एखादं काम अंगावर घेतलं तर पूर्ण केल्याशिवाय सोडत नाहीत. मनाने मऊ पण शिस्तीला कडक एकदम.

(डबा आणण्यासाठी आत जाते. तो अंगणात पुढे येऊन परिसर न्याहाळू लागतो.तोवर वसुधा डब्याची पिशवी घेऊन बाहेर आलेली आहे.

वसुधा : चलतोस ना?

वसंत : हो, घर छान आहे तुमचं, हिरवळ आहे सर्वत्र. झाडी भरपूर आहे.

वसुधा : पोपट, साळुंक्या, भारद्वाज, हळद्या असे पक्षी सतत आजूबाजूला वावरत असतात. मोर इतके आहेत की  अंगणात येतात कधीकधी.
वसंत : काय म्हणता, मोर अंगणात येतात?
वसुधा : त्यात काय विशेष? शेकरूही दिसतं कधीकधी.
वसंत : शेकरू?
वसुधा : राज्य प्राणी आपला! (त्याला कळलेले नाही) अरे, उडणारी खारूताई!  माहीत नाही ना तुला? वाटलंच होतं. जवळचं दिसतच नाही आपल्याला, फक्त लांबच्या गप्पा मारता येतात.
(वसंत खजिल झालेला.त्याचा फोन वाजतो. फोन पहातो.  फोन त्याच्या पत्नीचा. क्षणभर विचार करतो आणि फोन न उचलता तसाच वाजू देतो.)
वसुधा : घे की फोन! बायकोचा असणार!
वसंत : “नाही; नाही, एवढा काही महत्त्वाचा नाही” असं म्हणत फोन बंद करून खिशात ठेवतो. सॅक पाठीला अडकवतो. “चला!” म्हणत निघतो. दोघेही बोळाकडून मागे निघून जातात. गाईच्या हंबरण्याचा आवाज येत आहे. हळूहळू अंधार.)

***

अंक पहिला / प्रवेश दुसरा

(प्रकाश उजळतो. स्थळ तेच. माधव कुंडीतील मोगऱ्याच्या वेलीला पाणी घालत आहे. वय पंचेचाळीस. खादीचा लेंगा-सदरा. हसतमुख व्यक्तिमत्व. डोळ्याला चष्मा. ज्या बाजूने वसंत वर आला त्याच बाजूने चैत्राली वर आली आहे. वय-२५. जीन पँट, कुर्ता, जॅकेट. पाठीला सॅक. बॉय कट. हातात फोन. दोघेही एकमेकांकडे पाहत आहेत)
चैत्राली : नमस्कार काका!
माधव : नमस्कार! (प्रश्नार्थक नजरेने पाहत) कोण पाहिजे?
चैत्राली : मी- मला...
माधव : इकडच्या दिसत नाही तुम्ही. कोण पाहिजे?
चैत्राली : वसंतला शोधतेय मी.
माधव : कोण वसंत?
चैत्राली : नवरा माझा. घरातून निघून गेलाय तो.
माधव : निघून गेलाय?
चैत्राली : हो. भांडण झालं आमचं रात्री.
माधव : घर सोडून निघून जावं एवढं मोठं भांडण?
चैत्राली : तो भांडला माझ्याशी. मी नव्हते भांडत.
माधव : टाळी कधी एका हाताने वाजत नाही. (काही क्षण तिचा अंदाज घेत) तुम्हाला माहीत होतं का तो इकडे येणार आहे म्हणून? जाणाऱ्याला एक वाट तर शोधणाऱ्याला हजार वाटा असतात.
चैत्राली : बरोबर आहे तुमचं पण अंदाज होता थोडा... त्याच्या आवडीनिवडी माहीत आहेत मला .
माधव : म्हणजे?
चैत्राली : त्याच्या बोलण्यात नेहमी ग्रामीण भाग, नद्या, झाडं, प्राणी, पक्षी यांचे उल्लेख येतात. गावाविषयीची त्याची ओढ माहीत आहे मला.
माधव : पण तो इथं आंबेवाडीतच येणार होता कशावरून?

चैत्राली : घरी पेपर पडला होता.
माधव : पेपर?
चैत्राली : हो, ‘सकाळ’! जाहिरात होती त्यात.
माधव : माझ्या लक्षात नाही आलं...
चैत्राली : इथं आंबेवाडीत दहावीच्या विद्यार्थ्यांना आयटीचं शिक्षण देण्यासाठी शिक्षक हवेत म्हणून जाहिरात आलीय. त्यानं ती अंडरलाईन करून ठेवलेली दिसली. त्यामुळे डोक्यात प्रकाश पडला माझ्या.
माधव : आय सी!
चैत्राली : बऱ्याच दिवसापास्नं नोकरीचं काहीतरी चाललं होतं त्याचं. सकाळी उठून बघते तर हा घरात नाही. फोन उचलत नाही. मग अंदाज बांधला आणि बाहेर पडले. पुण्याला ऑफिसात जाण्याऐवजी उलट्या दिशेनं चाकण गाडी पकडली. अर्ध्या तासात तीळगाव फाटा. तेथून रिक्षा घेऊन खाली पायथ्यापाशी पोचले आणि मग लोकांना विचारत विचारत वर आले.
माधव : नाव काय तुमचं?
चैत्राली : चैत्राली.
माधव : छान आहे.
चैत्राली : थँक्यू! शाळा कुठे आहे इथली?
माधव : (दाखवत) या बाजूने असं थोडं मागे गेलात की एक मैदान लागेल. त्याच्या टोकाला शाळा दिसेल. शाळेला लागूनच ऑफिस आहे त्यांचं.
चैत्राली : थँक्यू!
माधव : बसा जरा पाणी देतो. चहा करू का? की खायला देऊ का काही?
चैत्राली : नो थँक्यू! केळी, बिस्कीटं आहेत सोबत. वर येताना वाटेत चिंचेच्या झाडाखाली बसून खाल्ली थोडी.
माधव : ते झाड हा आमचा जाता-येतानाचा थांबा आहे.
चैत्राली : (उत्साहाने) काय चिंचा लागल्यात हो!
माधव : वर्षभर असतात त्या. जाणार येणारा प्रत्येकजण थांबतो तिथं. चिंच मिळाली नाही तर निदान तिचा कोवळा पाला थोडातरी खाल्याशिवाय राहवत नाही कुणाला.
चैत्राली : अगदी खरं आहे!
माधव : गाव कोणतं तुमचं?
चैत्राली : मला अरे तुरे केलं तरी चालेल.
माधव : एखाद्याला नाही आवडत. मान राखावा लागतो.
चैत्राली : माझं तसं काही नाही. उलट मोठ्यांचा मान आम्ही मान राखला पाहिजे.
माधव : संस्कारी घरातली दिसतेस.
चैत्राली : मी सांगलीची. बर्गेफॅमिली खूप प्रसिद्ध आहे तिथं.
माधव : आलं लक्षात. तुका म्हणे झरा आहे मुळचाची खरा.
चैत्राली : शिक्षक आहात का तुम्ही?
माधव : होतो. नोकरी सोडून दिली आणि इकडे आलो.
चैत्राली : नोकरी सोडून दिली?
माधव : द्यावी लागली. आता येथेच राहतो. मुलांना शिकवतो. लोकांची लहान-मोठी काम करून देतो. फार काही महत्त्वाकांक्षा नाही आपली. कष्टाची अर्धी भाकरी खाऊन आनंदानं झोपता आलं की झालं.
चैत्राली : कोण कोण असतं घरी तुमच्या?

माधव : मी, माझी पत्नी वसुधा आणि अण्णा.
चैत्राली : अण्णा?
माधव : वडील माझे.
चैत्राली : इथं तर दिसत नाही कोणी.
माधव : अण्णा दिवसभर शाळेत असतात. संध्याकाळी घरी येतात. वसुधेची काही ना काही कामं सुरू असतात. आता गेली असेल अण्णांना डबा घेऊन. आज महादू आला नाही ना आमचा! द शो मस्ट गो ऑन!
चैत्राली : चांगले शिकलेले दिसताय-
माधव : दोघेही डबल ग्रॅज्युएट आहोत आम्ही!
चैत्राली : वाव्व! पण इतके शिकलेले असून या खेड्यात येऊन कसे काय राहिलात?
माधव : शिकलेल्या माणसांनी खेड्यात येऊन राहू नये असं आहे का? उलट त्यांनीच इकडे येऊन राहिलं पाहिजे.
चैत्राली : तुम्ही कसे काय आलात पण?
माधव : पंधरा वर्षांपूर्वी झालेल्या वादळी पावसात दरड कोसळून पन्नास-साठ घरांचं हे गाव पूर्णपणे उध्वस्त झालं.
चैत्राली : अरे बापरे!
माधव : अण्णांनी ठरवलं की इथं येऊन राहायचं. निराधार मुलांसाठी शाळा काढायची. त्यांना शिकवायचं. लोकांना मदत करायची.
चैत्राली : पण गव्हर्मेंट असतं ना मदतीला?
माधव : हो पण आपणही हातभार लावायला नको त्याला? इथं येऊन त्यांनी नवचेतना विद्या मंदिर ट्रस्टची स्थापना केली. आपला सगळा पैसा ओतून शाळा उभी केली. वाढवली. दहावीची दुसरी बॅच बाहेर पडली यंदा.
चैत्राली : आय सी!
माधव : माई अण्णांच्या पाठोपाठ मग आम्हीही आलो. पुण्यात अगदी मजेत होतो आम्ही. दोघांनाही नोकरी होती. चांगला पगार होता पण आमचे अण्णा पडले महात्मा गांधींसारखे हट्टी.
चैत्राली : म्हणजे?
माधव : ते आम्हाला म्हणायचे, “नुसते दिवस ढकलू नका, ‘जगायला शिका!” (पुढे स्पष्ट करत) आम्ही इकडे येऊन त्यांना मदत करावी अशी त्यांची अपेक्षा होती.
चैत्राली : ते बरोबरच आहे म्हणा!
माधव : ‘दोन मेणबत्या’ हा काणेकरांचा लघु निबंध तुला माहीत आहे का?
चैत्राली : ऐकलंय पण नक्की काय आहे त्यात माहीत नाही.
माधव : ‘स्वतःसाठी जगलास तर मेलास दुसऱ्यासाठी जगलास तर जगलास!’
चैत्राली : व्वा, छान वाटलं ऐकायला!
माधव : अण्णांचा पिंड अशा प्रकारच्या कार्यकर्त्याचा. आंबेवाडी उध्वस्त झालं आणि दुसरी कसली पर्वा न करता लगेच काम सुरू केलं त्यांनी इकडं येऊन.
चैत्राली : आणि त्यांच्याबरोबर माईंनाही यावं लागलं.
माधव : अगदी बरोबर. एक दिवस माई खूप आजारी पडली. ॲडमिट करावं लागलं तिला. मग मात्र आम्ही पुणं कायमचं सोडून इकडे आलो.
चैत्राली : दोघेही खुश झाले असतील मग–
माधव : हो बरोबर, पण आम्ही इकडे आलो आणि त्या आठवड्यातच माई हे जग सोडून गेली.
चैत्राली : अरेरे! आय ॲम सॉरी!

माधव : त्यातल्या त्यात एक बरं की ती जिवंत असतानाच आम्ही इकडं आलो. अण्णांकडे बघायला हक्काचं कोणीतरी आहे हे अखेरच्या क्षणी लक्षात आलं होतं तिच्या. समाधानानं गेली ती. (संगीत)
चैत्राली : छान निर्णय घेतलात तुम्ही. (निघत) चला, जाऊन बघते शाळेत.
माधव : जा तू– पण–
चैत्राली : पण काय?
माधव : तुमच्या भांडणाचं नेमकं कारण नाही सांगितलंस.
चैत्राली : पकडलंत तुम्ही मला बरोबर.
माधव : शिक्षक आहे मी!
चैत्राली : सांगू की नको असं झालंय.
माधव : मी समजू शकतो. एकतर ते विचारण्याचा मला अधिकार नाही आणि तूही एखाद्या परक्या माणसावर एकदम विश्वास टाकणं योग्य नाही.
चैत्राली : तसं नाही काही, पर्सनल आहे म्हणून–
माधव : सांगायचं असेल तर सांग नाहीतर जाऊदे!
चैत्राली : तुम्हाला मूर्खपणा वाटेल, हसू येईल.
माधव : नाही वाटणार तसं काही, सांग!

*

(अंधार होतो. काही क्षणांनी प्रकाश. चैत्राली आणि वसंत यांच्या तळेगाव येथील घराचा एक कोपरा. छोटा सोफा, सेंटर टेबल.दोघांच्याही वेशभूषेत अल्पसा बदल. वसंतने लॅपटॉपमध्ये डोके खुपसलेले. चैत्राली बाजूला धुसफूसत उभी. तो लक्ष देत नाही म्हणून ती चिडलेली.)
चैत्राली : बघावं तेव्हा तू लॅपटॉपवर असतोस.
वसंत : आणि तू नाही फोनवर सतत बोलत बसलेली?
चैत्राली : मग काय करू? माझ्याशी बोलायला वेळ कुठाय तुला? लग्नाच्या आधी किती बोलायचास!
वसंत : लग्न झालेली माणसं सुरुवातीला असंच बोलतात.
चैत्राली : प्रेम किती करायचास?
वसंत : आता नाही करत?
चैत्राली : तुला खरंच वाटतं तसं?
वसंत : त्याचा हिशेब ठेवत नाही मी!
चैत्राली : असा तिरसटासारखा बोलतोस म्हणून बोलायचं कमी केलंय मी हल्ली!
वसंत : जितकं कमी बोलू तितकं चांगलं.
चैत्राली : अगदीच न बोलणं उत्तम!
वसंत : (निर्विकारपणे) तुझी मर्जी!
चैत्राली : (काही क्षणांच्या शांततेनंतर) चारचौघांसारखा विचार न करता वेगळं जगायचं, काहीतरी नवं करून दाखवायचं. जागतिक पातळीवर नाव कमवायचं असं ठरवलं होतं आपण!
वसंत : नाव कमावणं वगैरे सगळ्या खुळचट कल्पना आहेत; असं लक्षात येतंय आता. उलट गावठी राहण्यातच खरी गंमत आहे.

चैत्राली : देशोदेशीच्या लोकांनी एकत्र येऊन नवं जग घडवलंय हे मान्य नाही का तुला? मी सांगली सोडून पुण्यात येऊन शिक्षण घेतलं, नोकरी मिळवली. तू अमरावतीवरून मुंबईला आणि तेथून पुण्यात आलास. वेगवेगळ्या ठिकाणी राहणारी, वेगवेगळे विचार असणारी माणसं एकत्र येतात, जगभर फिरतात, विकासाला हातभार लावतात हे कशामुळे घडतं?

वसंत : हो, पण 'खाओ पिओ मजा करो' या पलीकडे जात नाहीत ना ते हल्ली! त्या पलीकडे जणू काही अर्थच राहिलेला नाही जगण्याला.

चैत्राली : माझं नाही तसं, खूप काही करून दाखवावसं वाटतं मला. तुझ्या त्या साहित्यिक भाषेत बोलायचं तर काहीतरी योगदान द्यावसं वाटतं जगण्याला.

वसंत : योगदान वगैरे सोडून दे, मी नोकरी सोडून इथे आल्यापासून तू बदललीस हे खोटं आहे का?

चैत्राली : काहीतरीच बोलतोयस तू. आणि मला एक सांग पगार चांगला मिळत होता तुला यात काय खोटं होतं?

वसंत : पैसा मिळवणं हे माझं कधीच ध्येय नव्हतं.

चैत्राली : अरे पण जगण्यासाठी पैसा लागतोच ना?

वसंत : पण तेवढा तू मिळवतेस ना?

चैत्र : त्यात घराचे हप्ते वेगळेच. थोडा तुझाही हातभार असता तर कर्जाच्या ओझ्यातून जरा लवकर मोकळे झालो नसतो आपण?

वसंत : 'थोडा हातभार' हे समजू शकतो मी पण तुझं ते 'डबल इन्कम नो किड्स' अजिबात पटत नाही मला.

चैत्राली : काळाची पावलं नीट ओळखता आली पाहिजेत. मानानं जगायचं तर.

वसंत : तुझं प्रेम नाही राहिलं माझ्यावर हेच खरं.

चैत्राली : ग्रेट डिस्कवरी! या शोधाबद्दल नोबेल प्राईज दिलं पाहिजे तुला.

वसंत : तू टाळत नाहीस मला हल्ली?

चैत्राली : मी का टाळू? आणि लहान आहेस का तू सारखा सारखा डोक्यावर बसवून घ्यायला?

वसंत : बघितला असशील तू दुसरा कोणीतरी बाहेर.

चैत्राली : मूर्खासारखं बोलू नकोस. नवरा-बायकोत जरा काही झालं की बाहेर काहीतरी भानगड सुरू असणार एवढंच डोक्यात बसलेलं असतं लोकांच्या. तुही असा विचार करशीलसं वाटलं नव्हतं.

वसंत : परवा म्हणालीस ना तू–

चैत्राली : काय?

वसंत : घरात बसून आयतं खातोयस म्हणून?

चैत्राली : बोलताना असं एखादं वाक्य जातं तोंडून–

वसंत : मी सुद्धा असं काही बोललो कधी किंवा तुला अनपेक्षित असणारी एखादी गोष्ट केली तर वाईट वाटून घेऊ नको म्हणजे झालं.

चैत्राली : आपलं लग्न झालंय, एकत्र राहण्याची शपथ घेतलीय आपण.

वसंत : एकत्र राहणं हा एक रोमँटिसीझम असतो.

चैत्राली : पण त्यातूनच समजूतदारपणा वाढत जातो हे खरं नाही का?

वसंत : आपल्यात काही फरक झाला का हे सांग!

चैत्राली : तुझा नेमका प्रॉब्लेम काय आहे तेच कळत नाही मला. प्रत्येक वेळी काही ना काही नवीन मुद्दा काढत असतोस तू! काय झालंय तुला नक्की?

वसंत : असेल! काहीतरी हरवलंय माझं. जगात जे काही चाललंय ते पाहून जगण्यात काही अर्थ नाही असं वाटत राहतं मला. एखादं दु:स्वप्न जणू पाठलाग करत राहातं सारखा... असं काहीतरी स्वप्न– जे अंगावर येतं, छातीवर बसतं आणि म्हणतं उठ जागा हो! डोळे उघडून नीट बघ.

चैत्राली : ब्लडी पोएट!

वसंत : तुला समजत नाही त्याला मी काय करू?

चैत्राली : आलं लक्षात–

वसंत : काय?

चैत्राली : मला सोडून जाण्यासाठी काही ना काही कारणं शोधतोयस तू.

वसंत : पण मी का सोडून जाईन तुला? माझ्या काही फार अपेक्षा नव्हत्याच कधी. ज्यात समाधान आणि आनंद मिळेल एवढंच काहीतरी करायचं होतं मला. रात्री शांत झोप यावी एवढीच अपेक्षा होती माझी.

चैत्राली : अरे मग कुणी अडवलंय तुला? क्रिएटिव्हिटी हा गुणधर्मच आहे तुझा. शोध ना तुला जे हवं ते!

वसंत : तोच शोध सुरू आहे. कधीकधी वाटतं–

चैत्राली : काय?

वसंत : (थोडं थांबून) .

चैत्राली : अरे बोल ना काय ते!

वसंत : एक बाळ जन्माला घालावं, त्याला आपलं नाव द्यावं, आपल्या नजरेसमोर वाढवावं, मोठं करावं...

चैत्राली : अरे, असं मी म्हणायला पाहिजे?

वसंत : पण तू म्हणत नाहीस ना? 'डबल इन्कम नो किड्स'चं खुळ आहे तुझ्या डोक्यात.

चैत्राली : पण इतक्या लवकर बाळ होऊ द्यायचं?

वसंत : का नको?

चैत्राली : कर्तृत्व दाखवण्याचे, कमाई करण्याचे दिवस आहेत हे. परत येणार आहेत का ते?

वसंत : बाळ झाल्यावर कर्तृत्वाची सगळी अंगं नव्या ताकदीनं बहरून येतील असा का विचार करत नाहीस तू?

चैत्राली : रोमँटिक फूल!

वसंत : तुला माझं ऐकायचंच नसेल तर काहीतरी वेगळा निर्णय घ्यावा लागेल मला.

चैत्राली : कसला वेगळा निर्णय? डोक्यात काहीतरी राख घालून घेऊ नको म्हणजे झालं.

वसंत : माझ्यावाचून तुझं काही अडत नाही. तुला तुझी नोकरी आहे ना मग ती सांभाळत सुखाने राहा तू.

चैत्राली : म्हणजे?

वसंत : जसे जवळ आलो तसे दूरही जाऊ शकतो आपण.

चैत्राली : इतकं सोपं वाटतं तुला ते?

वसंत : सोपं-कठीण या गोष्टींना खूप अर्थ चिकटवून ठेवलेत आपण. त्यामुळे गुंता होतो सगळा. ती पाटी पुसून कोरी केली की काही त्रास होत नाही. तूही आनंदात राहशील जा तू घर सोडून!

चैत्राली : मी का जाऊ? तू जा हवं तर. आणि एक विसरू नको-

वसंत : काय?

चैत्राली : हे घर माझं आहे!

(संगीत. त्या उल्लेखाने तो दुखावलेला. वातावरणात तणाव. अंधार.)

*

(पुन्हा प्रकाश. पूर्ववत आंबेवाडी. चैत्राली आणि माधव बोलत आहेत.)
चैत्राली : मी म्हटलं होतं की आमच्या मूर्खपणाचं हसू येईल तुम्हाला.
माधव : मूर्खपणा काही नाही त्यात आणि हसण्यासारखं तर काहीच नाही! भावनांच्या अशा लाटा प्रत्येकाच्या जीवनात येत असतात. तुला जगावेगळं काहीतरी ग्लोबल असं करून दाखवायचं आणि मूल झालं तर  घरात अडकून पडू अशी भीती वाटतेय तुला. पण मुलं होणं ही अगदी स्वाभाविक गोष्ट आहे संसारातली आणि जीवनाचं चक्र व्यवस्थित चालू राहायचं तर निर्मिती ही आलीच.
चैत्राली : तेही खरं आहे.
माधव : आणि सृजनाचे क्षण किती सुंदर असतात हे अनुभवायला नको प्रत्येकानं?
चैत्राली : पण त्यासाठी नीट प्लॅनिंग केलं तर तो काही गुन्हा ठरतो का?
माधव : अशा गोष्टी ठरवून करण्यात काही गंमत नाही. उलट निसर्गाच्या फ्लोसोबत राहायला शिकलं पाहिजे आपण.
चैत्राली : तुमचं हे तत्त्वज्ञान तुमच्या हतबलतेतून आलय असं नाही वाटत तुम्हाला?
माधव : त्यात कसली हतबलता? आम्हाला मूलबाळ झालं नाही पण आम्ही काही रडत बसलो नाही. निर्मितीचा तो आनंद शेतीवाडीत सापडला आम्हाला आणि उलट अधिक उन्नत पातळीवर जाऊ शकलो आम्ही असं वाटतं आता. बीज कसं अंकुरतं आणि शिवार हिरवं कसं होतं हे अनुभवण्यासारखं दुसरं सुख नाही, हे इथं आल्यावर लक्षात आला आमच्या.
चैत्राली : (हात जोडत) ग्रेट आहात तुम्ही. (निघत) चला, येते मी.
माधव : मला एक सांग?
चैत्राली : काय?
माधव : तुझा नवरा नोकरीच्या उद्देशानं इकडे आला असेल तर त्यानं तुमच्या भांडणात तडजोड केलीय असा अर्थ होत नाही का त्याचा?
चैत्राली : आणि माझीसुद्धा तडजोडीची तयारी नसती तर त्याचा शोध घेत इथंवर कशाला आले असते मी?
माधव : मग तेच तर म्हणतोय मी. थांबवा तुमची ही
लुटूपुटीची लढाई आणि खरा पुरुषार्थ कशात आहे हे लक्षात घेण्याचा प्रयत्न करा! (चैत्राली गप्प) राहवलं नाही म्हणून बोललो. तुमच्या पर्सनल लाईफ मध्ये नाक खूपसण्याचा काही अधिकार नाही मला.
चैत्राली : तसं काही नाही वयानं आणि ज्ञानाने मोठे आहात तुम्ही. (नमस्कार करत) येते मी! (निघता निघता) घर खूप छान आहे तुमचं.
माधव : थँक्यू. इकडे मागे गोठा आहे, गाय आहे, कपिला नावाची. वासरू आहे. दूधदुभतं घरचंच आहे. परसदारी भाजीपाला करतो आम्ही. वांगी, काकडी, माठ, शेवगा, घोसाळी, पडवळ बहुतेक सगळं घरीच करतो. शाळेच्या खाली शेती आहे थोडी. तिथे भात, नाचणी, वरी असं काय-काय लावतो. हिवाळ्यात हरभरा, तूर,मूग काढतो. दिवस कसे जातात कळत नाही.
चैत्राली : ग्रेट! हल्ली असं काही स्वप्नसुद्धा पडत नाही.
माधव : पण ही सगळी अण्णांची करामत.
चैत्राली : शाळेचे नाव काय?
माधव : नवचेतना विद्या मंदिर.
चैत्राली : अहो मग हेच नाव होतं त्या जाहिरातीमध्ये
माधव : म्हणजे अगदी योग्य त्या ठिकाणी आलीयस तू!
चैत्राली : बरं झालं, शाळा कुठे आहे तेवढं दाखवा. पाहून येते मी वसंत इकडे आलाय का ते!
माधव : चल, मीच घेऊन जातो तुला. (क्षणभर विचार बदलत) एक मिनिट हं. कपिलेची पाण्याची वेळ झालीय, तिला जरा पाणी ठेवून येतो. (माधव बादली भरून गोठ्यात नेतो. इकडे चैत्रालीचा फोन वाजतो. घेते)

चैत्राली : (फोनवर) हॅलो, हॅलो नमस्ते सर. आय ॲम सॉरी सर. हो सॉरी सर. मी कळवू शकले नाही तुम्हाला. खरं तर सकाळी नेहमीप्रमाणे निघाले होते पण मध्येच काहीतरी अर्जंट काम निघालं त्यामुळे येऊ शकले नाही ऑफिसला. काय? हो, ते पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन सकाळीच मेल केलंय तुम्हाला. फाईल ओपन होत नाही? पाठवते थोड्या वेळानं परत. लॅपटॉप सोबतच आहे माझ्या. प्लीज, हो थँक्यू सर. आणि दुसरं काही अर्जंट असेल तर सांगा करून पाठवीन इकडनंच. तसा मेसेज पाठवा सर. ओके थँक यू सर, नाही नाही उद्या नक्की येते सर! मला माहीत आहे नोकरी ही माझी गरज आहे आणि कंपनी भरपूर पगार देते मला त्यासाठी... म्हटलं ना सॉरी एकदा, पुन्हा म्हणते हवं तर. ओके सर, थँक्यू सर!

माधव : (बाहेर पडत) कुणाचा फोन होता?

चैत्राली : आमच्या शुक्ला साहेबांचा. ऑफिसला गेले नाही म्हणून फायर केलं त्यांनी मला. मीटिंग होती आज. माधव : काय काम करतेस तू?

चैत्राली : सॉफ्टवेअर इंजिनियर आहे. एखादा प्रकल्प चौकटीत कसा बसवायचा आणि शिस्तीत कसा पार पाडायचा याचा प्रोग्रॅम तयार करणं हे काम आहे माझं.

माधव : छान, पण तुला आवडतं का ते?

चैत्राली : आवडून घ्यावं लागतं; पगार मिळतो.(एकदम सटकत) पगार देतात म्हणजे काही उपकार करत नाहीत, आम्हीही घाम गाळतो ना आमचा!

माधव : म्हणजे जॉब सॅटिस्फॅक्शन नाही असंच ना?

चैत्राली : तसं नाही म्हणता येत पण एका गोष्टीचं जरूर वाईट वाटतं–

माधव : कोणती गोष्ट?

चैत्राली : स्वातंत्र्य गहाण टाकल्यासारखं वाटतं.

माधव : पगाराचा आकडा आणि स्वातंत्र्याचं मूल्य ही  परस्पर विरोधी टोकं आहेत हे विसरू नकोस कधी!

चैत्राली : (विचारात पडलेली)

माधव : आणि नोकरी म्हटली की त्रास होणारच. साहेब चुकत असले तरी आपण त्यांना तसं सांगू शकत नाही हेही तेथील एक सत्य. आम्हीही अनुभवलंय ते!

चैत्राली : चला, सगळं आवरून परत निघायचंय लगेच!

माधव : चला, चला!

(निघतात. मोरांच्या केका ऐकू येत आहेत.)

चैत्र : हा कसला आवाज?

माधव : मोरांचा.

चैत्राली :  मोर आहेत का इथे?

माधव : अगदी भरपूर, इथे अंगणात सुद्धा येतात

चैत्राली : काय म्हणताय, अंगणात मोर? विश्वास बसत नाही.

माधव : एकदा विश्वासाचं नातं निर्माण झालं की काहीही होऊ शकतं.

चैत्राली :ओह आय सी!

माधव : चल!

(निघतात. पुन्हा मोरांच्या केकांचा आवाज. अंधार.)

***

अंक पहिला / प्रवेश तिसरा

(प्रकाश. स्थळ तेच. हलकंसं संगीत. माधव-वसुधा, वसंत-चैत्राली बोळाकडून अंगणात येतात. वसुधा घरात जाते तर वसंत-चैत्राली खाटेवर बसतात. माधव तोंडावर पाणी मारून, हातपाय पुसत स्टूल ओढून बाजूला बसतो)
चैत्राली : (माधवला) आम्हाला आता निघायला हवं नाहीतर उशीर होईल घरी पोहोचायला.
वसंत : अण्णांची भेट झाली असती तर बरं झालं असतं असं वाटतं पण–
माधव : तुम्ही थांबू शकता, येतील ते थोड्या वेळात. ठाकुरवाडी काही फार लांब नाही येथून... आधी कल्पना असती तर शाळेत गेलोच नसतो आपण.
वसंत : बरोबर.
माधव : तरी बरं पालकरसरांना सांगून गेलेत ते; लगेच परत येतो म्हणून.
चैत्राली : (काळजीने) अजून किती वेळ लागेल सांगता येत नाही. परतायला उशीर होईल आम्हाला.
माधव : त्यात कसला उशीर? येथून खाली उतरायला जेमतेम अर्धा तास. फाट्यावरून एकदा का रस्त्याला लागलात की मग सगळ्या गाड्या पुणेमार्गेच जातात पुढे. त्यातली एखादी पकडून उतरा तळेगावला.
वसुधा : (ट्रेमध्ये लाडू चिवडा, पाण्याचा तांब्या-पेला घेऊन बाहेर येते. एकेकाला देत–) घ्या?
वसंत : हे काय, कशासाठी एवढं?
वसुधा : घ्या, दुपारचं जेवण झालेलं नाही तुमचं.
चैत्राली : आमच्यासाठी विनाकारण तुम्हाला कष्ट.
वसुधा : त्यात कसले कष्ट? दमला असाल, घ्या!
वसंत : थँक्यू.
वसुधा : असला औपचारिकपणा आवडत नाही आम्हाला, घ्या. भूक लागली असेल.
चैत्राली : (माधवला) वेळ कसा घालवता येथे तुम्ही?
माधव : वेळ घालवण्याचा प्रश्नच नाही. बराच वेळ शाळेत असतो आम्ही. अभ्यासक्रम, शिकवण्या, परीक्षा, विविध शैक्षणिक उपक्रम– कितीतरी गोष्टी आहेत. यावर्षी दहावीची तिसरी बॅच पडेल बाहेर...
वसंत : व्वा, कौतुक करावं तेवढं थोडंच आहे!
वसुधा : पण खरा आनंद कधी होईल माहिताय का?
वसंत : कधी?
वसुधा : आमची मुलं बाहेर जाऊन आय.टी.च्या क्षेत्रात नाव कमावतील तेव्हा.
माधव : म्हणूनच तर त्यांना माहिती-तंत्रज्ञान सोपं करून शिकवण्यासाठी चांगली माणसं शोधतोय आम्ही.
वसुधा : जग झपाट्यानं बदलत चाललंय. नवे बदल आत्मसात करायला नकोत का?
चैत्राली : बरोबर, आजचं हे नवं जग कसं आहे ते कळलंच पाहिजे मुलांना.
वसंत : (दाखवत) ह्या एवढ्याशा मोबाईलमध्ये सगळं जग सामावलेलं आहे आता. एका फोनवर हवी ती माहिती मिळते, हवी ती वस्तू मागवताच समोर हजर होते, कागदपत्रं जपून ठेवता येतात.
माधव : पैशांचे व्यवहारही मोबाईल वरून करायला लागलेत लोक हल्ली.
माधव : या अशा गोष्टी इथल्या मुलांना कोणीतरी सोप्या करून पण प्रभावीपणे सांगण्याची गरज आहे.
वसंत : खरं आहे.
माधव : आणखी एक लक्षात घ्या–
वसंत : काय?

माधव : तंत्रज्ञानानं सगळं सोपं केलंय पण आळशीसुद्धा केलंय त्यांनं माणसाला.
वसुधा : बरोबर.
माधव : म्हणून त्याचे तोटे काय आहेत हे शिकवणंही गरजेचं आहे मुलांना.
वसंत : बरोबर.
(प्रकाश हलकासा बदलतो. गाय  हंबरत आहे.)
वसुधा : ही का हंबरतेय; अण्णा आले वाटतं...
(माधव अण्णांकडे तर वसुधा आत जायला निघते. काही क्षणांनी अण्णा प्रवेश करतात. वय ७०. खादीचा लेंगा सदरा जॅकेट टोपी खांद्याला पिशवी. मिशा, कानावरून दोरी लोंबणारा चष्मा. माधव त्यांच्या हातातील पिशवी घेतो. ते हातपाय धुवून बाजूच्या दोरीवर टांगलेल्या पंचाने तोंड पुसत खाटेवर बसतात. वसुधा आतून तांब्या-पेला घेऊन येते, अण्णांन देते. ते पाणी पीत आहेत.)
माधव : शाळेत जाऊन आलो आम्ही, तुम्ही नव्हता.
अण्णा : ठाकूरवाडीला गेलो होतो.
माधव : ते कळलं पालकरसरांकडून.
अण्णा : कांचनच्या वडलांना भेटायचं होतं.
माधव : का, काय झालं?
अण्णा : तिचे वडील शाळेतनं नाव काढताहेत तिचं...
माधव : अरे!
अण्णा : खूप हुशार आहे ती मुलगी.
माधव : हो ना!
अण्णा : शिकली तर खूप मोठी होईल, काढू नका शाळेतनं असं परोपरीनं सांगितलं.
वसुधा : पण कारण काय तिचं नाव काढण्याचं?
अण्णा : घरी कामाला कोणी नाही असं म्हणत होते. मी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला तर, यंदा लग्न करायचंय तिचं असं म्हणून मोकळे झाले.
वसुधा : म्हणजे पुढचं बोलणंच खुंटलं.
अण्णा : किमान ग्रॅज्युएट तरी होऊ दे असं म्हटलं पण ऐकायलाच तयार नाहीत.
वसुधा : जग इतकं पुढे गेलं पण मुलींचं काही खरं दिसत नाही अजूनही आपल्या देशात.
माधव : खरं आहे.(अण्णाना) उशीर का झाला तुम्हाला यायला?
अण्णा : येताना गायत्रीच्या उगमापाशी बसलो थोडा वेळ. मोर फिरत होते आजूबाजूला. डोकं शांत झालं एकदम, मग उठलो. (त्या दोघांकडे त्यांचं लक्ष जातं, माधवला) पाहुणे कोण?
माधव : (ओळख करून देत) हा वसंत.
वसंत : नमस्कार सर.
अण्णा : नमस्कार.
माधव : आणि ही चैत्राली.
चैत्राली : (वाकून नमस्कार करत) नमस्कार करते!
अण्णा : सुखी रहा. कुठून आलात? काय काम होतं?
वसंत : तळेगाववरून आलो. ‘सकाळ’मधली जाहिरात वाचली तुमची.
अण्णा : अच्छा, पण त्या मुलाखती उद्या होणार आहेत.

वसंत : उद्या? अरे देवा! मला वाटलं आजच की काय!
अण्णा : हेच नडतं तुमचं. नीट वाचली असती तर लक्षात आलं असतं. एका कामात धड लक्ष नसतं तुमचं.
वसंत : सॉरी सॉरी... खरंच माझ्या लक्षात आलं नाही.
चैत्राली : तुम्हाला विनाकारण त्रास दिला, निघतो आम्ही.
माधव : (हस्तक्षेप करत) मीच थांबवून घेतलं त्यांना. म्हटलं बोलू अण्णांशी. निदान भेट तरी होऊन जाईल.
वसुधा : (स्पष्ट करत) दोघेही नवरा बायको आहेत. हा नोकरीच्या विचारात आहे आणि हिला ऑलरेडी पुण्यात नोकरी आहे.
अण्णा : (वसंतला) काय शिकलायस तू? काय करतोस?
वसंत : बी.सी.एस. आहे. बॅचलर ऑफ कॉम्प्युटर सायन्स.  कॉम्प्युटर इंजिनिअर म्हणून काम करतो.
अण्णा : असं होय? मला काय कळतंय त्यातलं म्हणा! नावाला अध्यक्ष मी संस्थेचा. सगळं काम हा माधव आणि वसुधाच पाहतात.
वसंत : असं वाटत नाही तुमचा उत्साह बघून.
अण्णा : अरे खरंच; तंत्रज्ञान म्हणशील तर साधा मोबाईलही वापरता येत नाही मला नीट. आता यानिमित्तानं मीसुद्धा वर्गात बसून शिकायचं ठरवलंय.
चैत्राली : व्वा! दॅट्स द स्पिरीट!
अण्णा : मला जरी त्यातलं काही समजत नसलं तरी जुन्या पिढीनं तंत्रज्ञानाशी दोस्ती करावी या मताचा आहे मी.
वसंत : येईल तुम्हाला सगळं. इतकी सॉफ्टवेअर्स आलीत बाजारात की तुम्हाला स्वतःला काही करायची गरज नाही.
अण्णा : म्हणजे?
वसंत : (मोबाईल दाखवत) आपला पर्सनल असिस्टंट म्हणून सगळी कामं करतो हा फोन.
अण्णा : (जणू गुगली टाकत) आपल्या मनात काय चाललंय हे कळतं का त्याला?
वसंत : तेही होईल एक दिवस. सुरुवात झालेलीच आहे.
अण्णा : ती कशी काय?
चैत्राली : एखादी वस्तू ऑनलाइन मागवली आपण तर डझनावारी कंपन्या तशा वस्तूंची नवी माहिती धडाधड पाठवायला लागतात आपल्याला. म्हणजे तुम्हाला काय हवं ते कळलं की त्याला! अल्गोरिदम म्हणतात त्याला.
माधव : अरे पण अल्गोरिदमला स्वतःची बुद्धी नाही, मन नाही, भावना नाहीत, संवेदना नाहीत– आपण जी माहिती देतो त्याला तीच त्याची ताकद. यंत्र काही त्याचं स्वतःचं डोकं चालवत नाही.
चैत्राली : त्यावरही संशोधन सुरू आहे आता. ए.आय.नं सर्वच क्षेत्रात हातपाय पसरले आहेत. वेगवेगळे प्रोग्रॅमस् स्वतःच स्वतःमध्ये दुरुस्त्या करायला लागलेत. त्यामुळं भविष्यातील अनेक निर्णय यापुढे यंत्रच घेतील आता. माणसाला विचारणारसुद्धा नाहीत ती!
अण्णा : म्हणजे कसं म्हणतेस?
चैत्राली : एखादं विमान बॉम्ब घेऊन शत्रूच्या हद्दीत चाललं  असेल तर तो बॉम्ब कुठे टाकायचा याचा निर्णय तो प्रोग्रॅम स्वतःच घेईल. माणसाच्या कमांडची वाट पाहणार नाही.
अण्णा : आणि त्या प्रोग्राममध्ये काही गडबड झाली तर?
चैत्राली : तर मग अगदी स्वतःच्याच देशावरही बॉम्ब टाकायला कमी करणार नाही तो.
वसंत : म्हणजे तंत्रज्ञानाचा नीट वापर केला नाही आपण तर प्रचंड गोंधळ होणार आहे भविष्यात असंच ना?
चैत्राली : अगदी बरोबर!
अण्णा : काय वाट लागायची ती लवकरच लागू दे म्हणावं म्हणजे नव्या जगाच्या निर्माणाची प्रक्रिया तरी पुन्हा नीट सुरू होईल.
वसुधा : पण ते नवं जग तरी संवेदनशील आणि माणुसकीला प्रतिष्ठा देणारं असावं एवढीच अपेक्षा!

माधव : तू नको काळजी करू आपण नसणार तेव्हा. (सगळे हसत आहेत)
वसंत : आपण हसतोय आता पण ब्रेनरॉट होत चाललोय आपण सगळे.
अण्णा : ब्रेनरॉट?
वसंत : मेंदू कामातून गेलाय सगळ्यांचा. स्वतःच्या पलीकडे जगच दिसत नाही कुणाला. प्रत्येकानं आपल्या भोवती संकुचितपणाचं एक भलं मोठं कुंपण घालून घेतलंय जणू.
माधव : आमच्या या छोट्याशा गावातसुध्दा ती साथ पसरायला सुरुवात झालीय हळूहळू.
चैत्राली : खरं की काय?
माधव : शाळेत येऊन बघा, आमची मुलंही फोनच्या विळख्यात कशी अडकत चाललीत ते दिसेल तुम्हाला. जी मुलं पटांगणात खेळताना दिसायला पाहिजेत ती चार भिंतीत मोबाईलस्क्रीनमध्ये गर्क झालेली दिसावीत-
वसुधा : यासारखं दुर्दैव नाही दुसरं!
वसंत : जगभर सगळीकडेच निर्माण झालीय ही परिस्थिती. आणि हे आव्हान इतकं प्रचंड आहे की आपण काय करणार असा प्रश्न पडतो अनेकदा.
अण्णा : तेच विचारणार होतो मी तुम्हाला. सांगा काय करायचं?
वसंत : प्रश्न खरंच गंभीर आहे
अण्णा : तुम्हीच जर असं म्हणायला लागलात तर आम्ही काय करायचं?
वसंत : वस्तुस्थिती नाकारून चालेल का?
अण्णा : बरोबर, पण इतकं निराश होण्याचं कारण नाही.
चैत्राली : म्हणजे?
अण्णा : हे बघ, हत्ती हा किती मोठा प्राणी हे आहे माहीत आहे ना तुला,?
चैत्राली : हो !
अण्णा : पण त्यावर बसलेला माहुत आणि त्याच्या हातातील अंकुश किती लहान असतो नाही का?
वसंत : अगदी बरोबर!
अण्णा : आपणही आपल्या बुद्धिचा वापर माहुताच्या हातातील अंकुशासारखा केला तर तंत्रज्ञानाच्या या राक्षसाला सहज नियंत्रणात ठेवू शकतो...
वसंत : वा वा, क्या बात है!
चैत्र : तुम्ही म्हणता तुम्हाला यातलं काही कळत नाही पण खरं वाटत नाही ते!
अण्णा : (आपला फोन वसंताकडे देत मुत्सद्दीपणाने) माझं एक काम करतोस का?
वसंत : हो सांगा ना!
अण्णा : यावर काही जुनी मराठी गाणी डाऊनलोड करून देतोस?
वसंत : हो, देतो की!
अण्णा : कधी कधी ऐकावीत असं वाटतं. मन शांत होतं.
वसंत : तुमचं आवडतं गाणं सांगा एखादं–
अण्णा : श्रावणात घन निळा बरसला...
वसंत : ( गाणी डाऊनलोड करू लागतो.)
अण्णा : पाडगावकर, बापट असे कवी आवडायचे मला. श्रीनिवास खळे, यशवंत देव अशी एकसोएक माणसं होती. चैत्राली : खरं आहे पण काळजी कशाला करताय? युट्युबवर छान छान कार्यक्रम उपलब्ध आहेत त्यांचे आपल्यासाठी. त्यांचं कशाला जे काही हवं ते मिळतं इथं आपल्याला.

अण्णा : कल्पना आहे त्याची पण आपण त्यात वाहून जाता कामा नये एवढाच मुद्दा.
चैत्राली : तेही खरंच आहे म्हणा...
अण्णा : आणि माझं म्हणशील तर काय राहिलंय आता?
चैत्राली : म्हणजे?
अण्णा : वरचं आमंत्रण कधी येणार त्याची वाट बघतोय.
चैत्राली : काही काळजी करू नका, विज्ञानाच्या प्रगतीमुळे माणसाचं आयुर्मान खूप वाढलंय हल्ली...
वसंत : (फोन परत करत) हा घ्या फोन, बरीच गाणी डाऊनलोड करून ठेवलीत. वर हे शॉर्टकटचं चिन्ह आणून ठेवलंय. ते दाबलं की गाण्याचा फोल्डर आपोआप उघडेल . हवी तेवढी गाणी ऐकत बसा. आणि हो–
अण्णा : काय?
वसंत : रिंगटोनही बदललीय फोनची.
अण्णा : म्हणजे नेमकं काय केलंस?
वसंत : तिथंही गाणंच ठेवलंय. फोन आला की आधी ते गाणं वाजणार...
अण्णा : वा, हे छान केलंस.
चैत्राली : निघू का आम्ही आता?
अण्णा : (विचारी मुद्रेने) आपण असं करू–
वसंत : काय?
अण्णा : विचार करून ठरवू इंटर्व्यूचं काय करायचं ते. थांबा तुम्ही थोडा वेळ. वाटल्यास गाव बघून या आमचं. मोकळ्या हवेत फिरा. गायत्रीचा उगम पाहून या. झालंच तर मुक्काम करा आज इथं.
चैत्राली : मुक्काम?
माधव : हो, बरोबर बोलताहेत ते. आभाळ भरून आलंय. जाण्याची घाई करू नका.
चैत्राली : ऑफिस असतं मला, शुक्लासाहेब चिडले होते सकाळी माझ्यावर चांगलेच.
माधव : त्याच्याबरोबर तुही दे इंटरव्यू हवं तर!
चैत्राली : मी?
माधव : त्यात काय आश्चर्य? तुमच्या पिढीतली कितीतरी मंडळी वारंवार नोकऱ्या बदलतात की हल्ली.
वसुधा : (चैत्रालीला) विचार कर! आम्ही इथे पहिल्यांदा आलो तेव्हा मलासुद्धा तुझ्यासारखे अनेक प्रश्न पडले होते. पण हळूहळू गाडी रुळावर येत गेली. इतकंच काय पण योग्य सूर गवसतोय जगण्याचा असंही लक्षात येऊ लागलं हळूहळू!
चैत्राली : पण माझं अगदी व्यवस्थित चाललय सगळं...
माधव : आमचा काही आग्रह नाही! तुझ्या बॉसचा फोन आला तेव्हा किती अस्वस्थ झाली होतीस आठवलं मला म्हणून बोललो मी. आणि स्वातंत्र्याचा मुद्दा तूच काढला होतास ना?
अण्णा : अरे तिचं ती बघून घेईल तू उगाच डायरेक्शन करत बसू नको तिला.
वसुधा : अगदी बरोबर बोललात अण्णा. डायरेक्शनची उबळ अधून मधून अचानक अशी वर येते त्यांची!
माधव : राहिलं!
अण्णा : (चैत्रालीला) हे बघ, संधी पुन्हा पुन्हा मिळत नाही. योग्य वेळी योग्य निर्णय घ्यावे लागतात. प्रसंगी तडजोडी कराव्या लागतात.
चैत्राली : ते मान्य आहे.
अण्णा : आणि तरीही आपली सगळी स्वप्नं पूर्ण होतील असं नाही. अगदी माझा सुद्धा अपवाद नाही त्याला.
चैत्राली : तुमचं कसलं स्वप्न अपूर्ण राहिलंय?

अण्णा : तुम्हाला हसू येईल सांगितलं तर…
चैत्राली : नाही येणार, सांगा.
अण्णा : मी आमच्या लहानपणी सिनेमे खूप बघायचो.
चैत्राली : काय म्हणता?
अण्णा : हो ना! आपण एकदा तरी सिनेमात काम करावं अशी फार इच्छा होती माझी…
वसंत : चॅयला कमाल आहे!
चैत्राली : मग ती पूर्ण झाली की नाही?
अण्णा : कसली पूर्ण होतेय–
वसंत : का?
अण्णा : (माधवकडे बोट दाखवत) ह्याच्या आईनं अडवलं.
वसंत : ते का?
अण्णा : मी सिनेमात काम करायला तिची हरकत नव्हती पण एखाद्या नटीबरोबर पळून गेलो असतो तर काय याची भीती होती तिला. (सारे हसतात)
अण्णा : बरं चला आता, जेवण करून घेऊ, उपवास सोडायचा आहे.
माधव : साबुदाण्याची खिचडी आज परत आली शाळेतून.
अण्णा : अचानक ठाकुरवाडीला जावं लागलं त्यामुळं इलाज नव्हता. आता संपवून टाकू ती, चला.
चैत्राली : (चुळबुळत) खरंच निघतो आम्ही–
वसंत : विनाकारण गळ घालू नका.
अण्णा : अरे आज शेवटचा श्रावण-सोमवार, सगळ्यांनी मिळून एकत्र जेवणाचा आनंद घेऊया की!
चैत्राली : प्लीज…
वसुधा : (बाहेर डोकावत) चला, जेवण तयार आहे.
वसंत : फार संकोचल्यासारखं वाटतंय हो.
अण्णा : त्यात कसला संकोच? आणि जर तुम्हाला इंटर्व्यू द्यायचा असेल तर जेवण ही अट समजा आमची! (शांतता)
वसंत : (चैत्रालीला) काय करायचं? राहूया का आज?
चैत्राली : अरे पण–
वसंत : उद्या जाऊ… ऑफिसचं काही अर्जंट काम असेल तर करून टाक येथूनच. कनेक्टिव्हिटी चांगली आहे येथे.
चैत्राली : अरे पण राहणार कसं? कपडे नाहीत, नेहमीचं सामानसुमान नाही.
वसुधा : त्याची काळजी करू नको. सगळी व्यवस्था होईल. माझ्याकडे तुझ्यासाठी कपडे आहेत. यालाही माधवचे कपडे चालतील. इकडे एक स्वतंत्र खोली आहे. त्यात राहायचं तुम्ही. शाळेच्या इन्स्पेक्शनसाठी येणारे अधिकारी घरीच राहतात आमच्या.
(एकदम श्रावणात घननिळा वाजू लागतं.)
अण्णा : आता मध्येच गाणं कुठं सुरू झालं?
वसंत : फोन वाजतोय तुमचा.
अण्णा : असं होय? बघू– ( फोन पाहू लागतात) गाणं इतकं छान आहे की फोन उचलावा असं वाटतंच नाही.
माधव : खरं आहे तुमचं पण एक माहीत आहे का?
अण्णा : काय?

माधव : पन्नास वर्षांपूर्वी पाडगावकरांनी हे जेव्हा लिहिलं तेव्हा बाहेर कडक उन्ह होतं आणि ते घामाघूम होऊन ट्रेनने प्रवास करत होते.
अण्णा : याचा अर्थ एवढाच की प्रतिकूल परिस्थितीतही चांगल्या गोष्टी घडू शकतात, बरोबर ना?
माधव : अगदी बरोबर.
(पुढच्या ओळी ऐकू येतात)
जागून ज्याची वाट पाहिली, ते सुख आले दारी
जिथे तिथे राधेला भेटे, आता श्याम मुरारी...
अण्णा : जागून ज्याची वाट पाहिली 'ते सुख आले दारी...' किती छान वाटतं रे ऐकायला?
वसुधा : आणि ते सुख खरंच दारी आलं तर काय दुधात साखर!
अण्णा : त्यासाठी माणसानं नेहमी आशावादी राहिलं पाहिजे.
माधव : बरोबर!
अण्णा : आणि नुसता आशावाद कामाचा नाही तर नेमकी कृती केली पाहिजे.
चैत्राली : 'नेमकी कृती' म्हणजे?
अण्णा : डोकं शांत ठेवलं नेमकं काय करायचं ते कळू शकतं. मनाचा तळ गाठता आला तर तेथूनच जगण्याचा खरा सूर उमलण्याची शक्यता असते.
वसंत : लाख बोललात अगदी!
वसंत : वा, क्या बात है!
वसुधा : चला आता, पोटात कावळे कोकलायला लागलेत.
(सगळे हसत चला चला म्हणत आत जायला निघतात. श्रावणात घन निळा पुढं सुरू राहातं. हळूहळू पडदा.)

मध्यंतर

***

**सूचना :**
ज्यांना या नाटकाची पूर्ण संहिता हवी असेल त्यांनी लेखकाशी संपर्क साधावा. हे नाटक पूर्णपणे काल्पनिक असून त्यातील एखादी व्यक्ती व प्रसंग ह्यांचे प्रत्यक्ष जीवनात कोठे साधर्म्य आढळून आल्यास तो केवळ योगायोग समजावा. सर्व हक्क लेखकाकडे राखीव आहेत. प्रयोग करण्यापूर्वी लेखकाची लेखी परवानगी घेतली जावी. नाटकाचे भाषांतर, रूपांतर, त्यावर आधारित चित्रपट, चित्रमालिका, अभिवाचन, यूट्युब-फेसबुकवरील किंवा अशा अन्य माध्यमातून पूर्ण, अंशतः किंवा तत्सम कोणत्याही प्रकारच्या चित्रिकरण, ध्वनिमुद्रण, प्रसारण, अविष्कारापूर्वी लेखकाची परवानगी घेणे बंधनकारक आहे.

**प्रल्हाद जाधव**
pralhadjadhav.one@gmail.com

***